महत्वाचे/अतितत्वर्य

महापालिका आयुक्त कार्यालय,
पुणे महानगरपालिका
जावक क्रमांक : मआ/[illegible]/१५
दिनांक : १२/४/१२

## कार्यालयीन आदेश

विषय : शहरात पिण्याच्या पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक कारवाई तसेच प्रशासकीय शुल्काची आकारणी करणेबाबत.

संदर्भ : जावक क्रमांक SWM/६६, दिनांक २२.०४.२००८ चे कार्यालयीन आदेश.

संदर्भांकित कार्यालयीन आदेशाद्वारे 'स्वच्छ पुणे, सुंदर पुणे' संकल्प मोहिम–अस्वच्छता करणाऱ्या नागरिकांकडून प्रशासकीय शुल्काची आकारणी करणेबाबत बहुउद्देशीय पथकाला (मल्टीपर्पज स्क्वाड) यांना आदेश देण्यात आलेले आहेत. या आदेशातील क्रमांक १६ व १७ द्वारे पाण्याचा अपव्यय करणाऱ्याविरुद्ध कारवाई करण्याबाबतचे आदेश या पथकाला देण्यात आलेले आहेत.

वरील आदेश या कार्यालयीन आदेशाच्या दिनांकापासून सुधारित करण्यात येत असून, संदर्भांकित आदेशातील अनुक्रमांक १६ व १७ येथे नमूद केलेले प्रशासकीय शुल्क वसूल करण्याचे आदेश खालील नमूद केलेल्या मनपाच्या विविध खात्यांकडील अधिकारी / सेवक यांना देण्यात येत असून, त्यानुसार सदर अधिकारी / सेवक यांनी त्वरीत कारवाई सुरु करावी.

| अ. क्र. | पदनाम | कार्यक्षेत्र | वसूल करावयाचे प्रशासकीय शुल्क |
|---|---|---|---|
| १. | इमारत निरिक्षक (बांधकाम) मुख्य खाते तसेच क्षेत्रीय कार्यालये | • बांधकामासाठी पिण्याच्या पाण्याचा वापर होत असल्यास<br>• रस्त्यावर विनाकारण पाणी टाकणे किंवा पाण्याचा नळ सोडणे. | रुपये १०००/-<br>रुपये १००/- |
| २. | पेठ निरिक्षक / विभागीय पेठ निरिक्षक (मुख्य खाते व क्षेत्रीय कार्यालये) | • सोसायट्या/घरे इत्यादी ठिकाणी पिण्याच्या पाण्याचा गैरवापर होत असल्यास<br>• रस्त्यावर विनाकारण पाणी टाकणे किंवा पाण्याचा नळ सोडणे. | रुपये १०००/-<br>रुपये १००/- |
| ३. | आरोग्य निरिक्षक / विभागीय आरोग्य निरिक्षक / मुख्य आरोग्य निरिक्षक (मुख्य खाते व क्षेत्रीय कार्यालये) | • हॉटेल, रेस्टॉरंट, मंगल कार्यालये, लॉजेस, व्यावसायिक ठिकाणे इत्यादी ठिकाणी पिण्याच्या पाण्याचा गैरवापर होत असल्यास<br>• रस्त्यावर विनाकारण पाणी टाकणे किंवा पाण्याचा नळ सोडणे. | रुपये १०००/-<br>रुपये १००/- |
| ४. | अतिक्रमण निरिक्षक, वसाहत अधिकारी, प्रभाग अधिकारी (मुख्य खाते व क्षेत्रीय कार्यालये) | • झोपडपट्ट्या, सार्वजनिक जागा, रस्ते, मनपा वसाहती, मनपा व्यावसायिक इमारती इत्यादी ठिकाणी पिण्याच्या पाण्याचा गैरवापर होत असल्यास<br>• रस्त्यावर विनाकारण पाणी टाकणे किंवा पाण्याचा नळ सोडणे. | रुपये १०००/-<br>रुपये १००/- |
| ५. | परवाना निरिक्षक (आकाशचिन्ह विभाग) (मुख्य खाते व क्षेत्रीय कार्यालये) | • लघुउद्योग, व्यावसायिक ठिकाणे, कारखाने इत्यादी ठिकाणी पिण्याच्या पाण्याचा गैरवापर होत असल्यास<br>• रस्त्यावर विनाकारण पाणी टाकणे किंवा पाण्याचा नळ सोडणे. | रुपये १०००/-<br>रुपये १००/- |

महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र. SWM/EE
दिनांक : 22/4/08

## कार्यालयीन आदेश

विषय : 'स्वच्छ पुणे सुंदर पुणे' संकल्प मोहिम – अस्वच्छता करणाऱ्या नागरिकांकडून प्रशासकीय शुल्क आकारणीचे अधिकार बहुउद्देशिय पथकाला (Multi purpose Squad) देणेबाबतचे आदेश.

संदर्भ :

१. मा. महापालिका आयुक्त ठराव क्र. ६/२८५, दि. १५/१०/९९ अन्वये आदेश जा. क्र. मआ/४६८, दि. १५/१०/९९.
२. मा. महापालिका आयुक्त ठराव क्र. ६/२९७, दि. १७/१/२००१ आज्ञापत्रक जा. क्र. मआ/५६०, दि. १८/१/२००१.
३. मा. महापालिका आयुक्त ठराव क्र. ६/३८१, दि. १६/२/२००१ आज्ञापत्रक जा. क्र. मआ/६०४, दि. १६/२/२००१.
४. स्थायी समिती ठराव क्र. ६०२ दि. १/८/२००६.

वरील संदर्भांकित आदेशामध्ये पुणे महानगरपालिकेच्या स्वच्छता संकल्प मोहिम अंतर्गत मनपाच्या एकूण चौदा क्षेत्रिय कार्यालयाच्या हद्दीमध्ये सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता करणाऱ्या नागरिक, रहिवासी, दुकानदार, स्टॉलधारक, व्यावसायिक यांचे कडून प्रशासकीय वसूल करण्याचे दर वरील संदर्भांकित आदेशान्वये निश्चीत करण्यात आलेले आहेत. त्याच प्रमाणे पुणे महानगरपालिकेच्या सार्वजनिक रस्त्यावर अनाधिकाराने पाणी सोडणे अथवा वाया घालविणे याबाबतचा उल्लेख नाहता. तसेच बहुउद्देशिय पथकाला (Multi purpose Squad) सार्वजनिक रस्त्यावर बॅनर्स, पोस्टर्स, जाहिराती लावणे, म.न.पा.च्या हद्दीतील सार्वजनिक भिंतीवर जाहिराती लिहणे ही विनापरवाना कामे केल्यामुळे डिफेसमेंट ऑफ पब्लिक प्रॉपर्टी ॲक्ट १९९५ चे कलम ३ अन्वये जाहीरातीवरांवर कारवाईचे अधिकार तात्पुरते देण्यात आलेले होते. त्या बाबी विचारात घेऊन बहुउद्देशीय पथकातील (Multi purpose Squad) सार्वजनिक रस्त्यावर अनाधिकाराने जाहीरातीचे पोस्टर्स लावणे किंवा म.न.पा.च्या सार्वजनिक भिंतीवर लिहणे किंवा रस्त्यामध्ये, सार्वजनिक ठिकाणी, पाण्याच्या स्रोतात कचरा टाकणे याबाबत कारवाईचे आदेश देण्यात येत आहेत. तसेच महापालिकेच्या रस्त्यावर पाणी वाया घालविणे, वाहनांचे कर्कश आवाज करणे किंवा मोठ्या आवाजाचे हॉर्न वाजविणाऱ्या विरुद्धही प्रशासकीय शुल्क वसुलीची कारवाई करण्याचे अधिकार बहुउद्देशीय पथकाला (Multi purpose Squad) देण्यात येत आहेत.

प्रशासकीय शुल्क वसुलीचे दर खालील प्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | रस्त्यावर विष्ठा किंवा मलमुत्र टाकणे किंवा थुंकणे अथवा घाण करणे. | २५/- |
| २. | वैयक्तिक रित्या नागरिकांनी टाकलेला घन कचरा व द्रवरुप कचऱ्यासाठी प्रशासकीय शुल्क. | ५०/- |
| ३. | फेरीवाले, टपरीवाले यांनी केलेली घाण व टाकलेला कचरा. | १००/- |
| ४. | भाजी विक्रेते, मासळी विक्रेते यांचा द्रवरुप व घनरुप कचरा | १५०/- |
| ५. | भंगारवाले, रद्दी, काच, पत्रावाले, यांनी केलेल्या घाण व कचऱ्यासाठी. | १००/- |
| ६. | केश कर्तनालय, टेलर्स, बेकरीवाले, लाकडी फर्निचरवाले, रेडियो टिव्ही दुकानदार यांनी केलेल्या घाणीसाठी आणि त्यांच्या कचऱ्यासाठी. | २००/- |

| | | |
|---|---|---|
| | खानावळी, किराणा दुकानदार, लॉटरीवाले, हॉटेलवाले, स्टॉल आणि विक्रेते यांनी केलेल्या घाणीसाठी | ३००/- |
| ८. | रुग्णालये, लॅबोरेटरीज, शैक्षणिक संस्था, कोचिंग क्लासेस यांनी केलेल्या घाणीसाठी | २००/- |
| ९. | अनधिकृत हातगाडी, पथारीवाले यांचे रस्त्यावरील अतिक्रमण व घाणीसाठी | ५००/- |
| १०. | अनधिकृत स्टॉलधारक यांचे पदपथावरील अतिक्रमण व घाणीसाठी | ५००/- |
| ११. | २० मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या पिशव्या, प्लास्टिक कप, कॅरीबॅग अथवा तत्सम, प्लास्टिक कप्स, सिगारेट कप, आकाराने कापलेले कागद, अन्न पदार्थांच्या पॅकिंगसाठी वापरण्यात येणाऱ्या प्लास्टिक पिशव्या आणि विक्री या उत्पादन आवारासाठी | ५००/- |
| १२. | गुटखा विक्री व सेवन, गुटखा खाऊन थुंकणे व घाण करणे | ५००/- |
| १३. | मोठे व्यावसायिक 'अ' वर्ग व त्यापुढील हॉटेल्स, मंगल कार्यालये, चित्रपट गृहे, केटरर्स, धाबेवाले, लॉजेस, दवाखाने, हॉस्पिटल्स, डिस्पेन्सरीज, व्यावसायिक, वाशिंग सेंटर, मोठ्या दुरुस्ती गॅरेज व औद्योगिक संस्था यांनी केलेली घाण अथवा कचऱ्यासाठी. | १०००/- |
| १४. | रस्त्यावरील अनधिकाराने पोस्टर्स, बॅनर्स, जाहिराती बोर्ड लावणे. | २०००/- |
| १५. | रस्त्याच्या कडेला किंवा भिंतीवर अनधिकाराने जाहिराती बोर्ड लिहिणे किंवा लावणे | २०००/- |
| १६. | रस्त्यावर अनावश्यकरित्या पाणी सोडणे किंवा वाया घालविणे - दुकानदार, कार्यालये, मंगलकार्यालये यांच्यासाठी | १०००/- |
| १७. | खाजगी जागेतून रस्त्यावर पाणी विनाकारण टाकणे किंवा पाण्याचा नळ विनाकारण सोडणे. | १२००/- |
| १८. | मोटर गाड्यांचे हॉर्न ९० डेसिबल पेक्षा मोठ्याने वाजविणे, कर्कश आवाजाचे हॉर्न वाहनाला लावणे व वाजविणे. | १००/- |
| १९. | नदी, नाले, पाण्याचे स्रोत, सार्वजनिक ठिकाणी राडारोडा टाकणे | २५,०००/- प्रति ट्रक |
| २०. | अनधिकृत पार्किंग करणे. (तीन चाकी, चार चाकी) | १००/- |
| | अनधिकृत पार्किंग करणे. (दुचाकी) | ५०/- |
| २१. | पुणे शहराच्या सार्वजनिक रस्त्यावर प्रचारी कमान, कटेर्स, तुरे इत्यादी लावण्याचा | १०००/- ते ५०००/- |
| २२. | नदीपात्र, नाले व पाण्याच्या स्रोतात कचरा टाकणे. | १००/- |

या मंजूर केल्याप्रमाणे प्रशासकीय शुल्क आकारणीचे या महानगरपालिकेच्या विविध खात्यातील बहुउद्देशीय पथकाला (Multi purpose Squad) द्वारा वसुलीसाठी निश्चित करून देण्यात आलेले आहेत. त्यामुळे यापुढे पुणे महानगरपालिकेच्या पथकाने आणि अतिक्रमण विभागातील कर्मचाऱ्यांनी आणि कार्यालयातील अधिकारी व आरोग्य निरीक्षक आणि इतर मनपा कर्मचाऱ्यांनी या मंजूर केलेल्या दर पत्रकाप्रमाणे प्रशासकीय शुल्क वसूल करण्याची कार्यवाही करावी. तसेच हे बहुउद्देशीय पथक (Multi purpose Squad) हे क्षेत्रिय अधिकारी, क्षेत्रिय वैद्यकीय अधिकारी, सहाय्यक अभियंता यांच्या नियंत्रणाखाली काम करेल.

महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रत :
१. सर्व बहुउद्देशीय पथके (Multi purpose Squad)
२. अतिक्रमण विभाग
३. सर्व क्षेत्रिय अधिकारी
४. सर्व खाते प्रमुख